MHPU180021622016

<u>नि.दि.दा.क्र. ३०५/२०१६</u>
**(प्रविण व इतर वि. यशवंत व इतर)**

## <u>निशाणी ५३ वरील आदेश</u>

(दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी पारित)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण काढुन मिळावे तसेच त्यांनी वादीचे वहिवाटीस हरकत करु नये म्हणुन निरंतर मनाईचा अनुतोष मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये मोजणी अहवालानूसार अतिक्रमण क्षेत्रात प्रतिवादींचे येत असलेले बांधकाम काढुन घेणे आवश्यक असल्याने त्यासंबंधी दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. त्याचप्रमाणे, सदरील वादी यांनी त्यांच्या नावावरील दावा मिळकत त्यांचेसोबत त्यांची मुले सिध्देश नवनीत भागवत अ.पा.क. नवनीत माधवराव भागवत व पुष्कर प्रविण भागवत यांचे अ.पा.क. प्रविण माधवराव भागवत यांचे नावावर मे. न्यायालयातील वाटपान्वये केली आहे. सदर अर्जातील परिच्छेद क्र. ४ ते ६ प्रमाणे दुरुस्ती करणेस मे. न्यायालयाची परवानगी असावी. त्यामुळे सदरची दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळण्याचा अनुतोष मागीतला आहे.

३. प्रतिवादी क्र. ३ याने नि. ५७ वर म्हणणे देउन अर्ज मंजूर करण्यास आक्षेप घेतला आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, दावा दुरुस्ती करण्यासाठी दिलेले कारण योग्य नाही. दावा दुरुस्तीची मागणी चुकीची आहे. प्रस्तावित दुरुस्ती अन्वये दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत आहे. त्यामुळे, दावा दुरुस्ती करता येणार नाही. दावा दाखल करण्याचे कारण व दावा दुरुस्तीचे कारण वेगवेगळे आहेत त्यामुळे दावा दुरुस्तीची परवानगी देवू नये. प्रतिवादींनी आपली कैफियत दिलेली असुन सदरील दुरुस्तीने या प्रतिवादींचे बचावास बाधा येत आहे. वादींनी नि. १९ व ३३ अन्वये यापुर्वी दुरुस्तीचा

अर्ज दिला असुन सदरचा अर्ज दिनांक ०९.१०.२०१९ रोजी मंजुर केलेला आहे. यावरुन पुन्हा वादी हे केवळ सदरचा दावा प्रलंबित ठेवण्याच्या कुटील हेतुले खोटे नाटे अर्ज तयार करुन दाखल करत आहेत. तसेच, वादींनी सदरचा दावा दाखल केलेला असतांना देखील वादी यांनी जाणीवपुर्वक त्यांच्या मुलाचे नावे वाटप करुन दिलेले आहे. यामुळे वादी हे सगळे कृत्य जाणीवपुर्वक केवळ दावा प्रलंबित ठेवण्यासाठी करत आहेत हे स्पष्ट होते. वादींची दुरुस्तीकामी केलेली मागणी बघता याबाबतचा म्हणजेच प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांचे मिळकतीमध्ये गोठा बांधणेचा केलेला उल्लेख हा नि. ३६ मध्ये केलेला असतांना देखील वादी यांनी त्याबाबतचा खुलासा केलेला नाही. त्यामुळे, वादी यांचा सदरचा अर्ज फेटाळण्यालायक असुन फेटाळण्यात यावा. तसेच, विनाकारण अर्ज देवुन प्रतिवादींना त्रास दिला व वेळकाढुपणा केला म्हणुन सदरचा अर्ज फेटाळुन १०,०००/– रुपये कॉस्ट करण्यात यावी ही विनंती.

४. अर्जदारांच्या व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारांच्या वकीलांनी युक्तीवाद केला की प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही त्यामुळे अर्ज मंजुर करावा. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की गोठा अतिक्रमित क्षेत्रात आहे हि बाब नि. ३६ दाखल करतेवेळी वादींना माहित होती तरी देखील ती बाब त्यांनी त्याचवेळी दाव्यात समाविष्ट केली नाही. अशा प्रकारे, दाव्याचे कामकाज प्रलंबित ठेवण्याच्या हेतुने वादीने अर्ज करत आहे. त्यामुळे, अर्ज नामंजुर करावा.

५. प्रस्तावित दुरुस्ती अन्वये वादी यांनी त्यांच्या नावावरील दावा मिळकत सिध्देश नवनीत भागवत अ.पा.क. नवनीत माधवराव भागवत व पुष्कर प्रविण भागवत यांचे अ.पा.क. प्रविण माधवराव भागवत यांचे नावावर न्यायालयात वाटपाचा दावा दाखल करुन त्यातील वाटपान्वये केली आहे. अशा परिस्थितीत, वादी व प्रतिवादी यांच्यातील संपुर्ण वादावर परिणामकारकपणे निर्णय घेण्यासाठी त्यांची दाव्याच्या कामी आवश्यकता असल्याचे दिसुन येते.

६. प्रस्तावित दुरुस्तीचे व दाव्याचे अवलोकन केले असता अर्जदार प्रस्तावित दुरूस्ती

अन्वये दावा प्रलंबित काळात घडलेल्या घडोमोडी दाव्याच्या अभिलेखास आणू इच्छित आहे. सदर बाबी त्याने अर्जामध्ये परिच्छेद क्र. ५ मधील प्रस्तावित परिच्छेद क्र. ४.क. तसेच परिच्छेद क्र. ६ मधील प्रस्तावित परिच्छेद क्र. ८.अ. मध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती दाव्याच्या अभिलेखास आणु इच्छित आहे. दावा अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्तीने अतिक्रमित क्षेत्रात दावा प्रलंबित काळात घडलेल्या घडामोडी वादी दाव्याच्या अभिलेखास आणुन इच्छित आहे. दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होत असल्याचे दिसून येत नाही. वादीने प्रस्तावित दुरुस्ती अन्वये कोणतीही कबुली काढून घेतलेली नाही. तसेच, दावा प्रलंबित काळात वादींनी त्यांच्या कुटुंबात वाटप करुन घेतले आहेत व त्या वाटपात दोन सह धारकांना जमीन दिली असल्याने त्यांना देखील दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे दिसुन येते.

७. दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादींना काय अडचणीचे ठरणार आहे हे प्रतिवादींनी दर्शवून दिलेले नाही. प्रस्तावित दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादीच्या बचावास कोणतीही बाधा येत नाही. दाव्यात पुराव्यास सुरुवात झालेली नाही. त्यामुळे, प्रतिवादींना प्रस्तावित दावा दुरूस्तीमुळे काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी कुठल्याही प्रकारे नवीन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख-या वादाच्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक वाटते.

८. स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर. २००७ एस.सी. ११३ या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे. अशा परिस्थितीत, निरनिराळे दावे टाळणेसाठी सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**नि.दि.दा.क्र. ३०५/२०१६**
**निशाणी ५३.**

९. दावा दाखल केल्यानंतर वादींनी त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दोन वेळेस अर्ज दाखल केले होते व ते मंजुर केले होते त्यावेळी अतिक्रमित क्षेत्रात गोठा बांधला हि बाब नमुद करु शकले असते. परंतु, ती बाब त्यांनी का नमुद केली नाही या विषयी काहीच स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे, वादीचा दावा चालविण्यासाठीचा निष्काळजीपणा दिसुन येत आहे. तो दुर्लक्षुन चालणार नाही. वादीवर अर्जखर्च लादल्यास उद्देश सफल होईल. तरी वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. अर्जदारास अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.
३. अर्जदारांनी प्रतिवादी क्र. ३ यास रक्कम रु. ५००/–अर्ज खर्च म्हणून द्यावा.
४. अर्जदाराने दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही १४ दिवसात किंवा तत्पूर्वी करुन घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Nandkumar Balasaheb Jadhav
Date: 2021.02.18 15:37:51 +0530

दौंड.
दिनांकः १७/०२/२०२१.

(एन.बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, न्यायालय क्र. १.

<u>नि.दि.दा.क्र. ३०५/२०१६</u>
<u>निशाणी ५३.</u>

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. N. B. Jadhav, Civil Judge Junior Division, Daund [Court No.1]. |
| Name of the Steno | : | Miss. F. J. Bijapure, Steno Grade-3. |
| Judgment date | : | 17/02/2021. |
| Judgment signed by P.O. on | : | 17/02/2021. |
| Judgment uploaded on | : | 18/02/2021. |